# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १९.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**पोलीस ठाणे मानकापूर :— जबरी चोरी करुन जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक.**

दिनांक १९.०७.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास फिर्यादी शेख सलीम शेख समीर वय २६ वर्ष रा. बोरीयापुरा, मोमीनपुरा, नागपूर हे ऑटोचालक मोहम्मद काशिद मोहम्मद रफिक भाई वय ३५ वर्ष रा. मोमीनपुरा, नागपूर याचेसह ऑटोरिक्षाने मोमीनपुरा येथे त्यांचे कॅटरींग कामावरुन घरी परत जात असता, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, गोरेवाडा ते पिटेसुर जाण्याऱ्या रोडवरील हनुमान मंदीरकडे जाणारा टि—पॉईन्ट येथे एका मोटार सायकलवरुन आलेल्या आरोपींनी त्यांना अडवून हातबुक्कीने मारहाण केली ऑटोचालक काशिदभाई यांना गंभीर जखमी केले तसेच त्यांचे खिशातील मोबाईल व ३०००/— रु. जबरीने हिसकावून घेऊन तेथून पळून गेले. रात्रगस्त करणारे पोलीस तेथे त्वरीत पोहोचल्याने त्यांनी जखमी काशिदभाई यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल केले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपींविरुध्द कलम ३१०(३),३५१(३),३११ भा.न्या.सं. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा करण्यात आला.

तसेच यातील आरोपींनी वरील घटनेचे काही वेळापुर्वी, गोरेवाडा ते पिटेसुर रोडवरून जाणारे स्विगी डिलीव्हरी बॉय फिर्यादी निखिल मोरेश्वर चौधरी वय २६ वर्ष रा. वलनी, कळमेश्वर, जि. नागपूर यांना अडवून जखमी करुन, त्यांचे खिशातील १०००/— रुपये जबरीने काढून घेतले. .

मा. पोलीस आयुक्त यांचे रात्रगस्तीवरील विशेष पथकाचे सपोनि भगवान कोळी हे पथकासह गस्त करीत असतांना त्यांना पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत जुना काटोल नाका ते गोरेवाडा चौक दरम्यान, जबरी चोरी झाल्याचे तसेच पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील घटना बाबत माहिती मिळाल्याने, त्यांनी फिर्यादी यांचेकडे आरोपींबाबत चौकशी करुन त्वरीत नियंत्रण कक्ष येथे माहिती दिली. नियंत्रण कक्षाने नागपूर शहरातील रात्रगस्तीवरील सर्व पेट्रोलींग वाहने व कर्मचारी यांना सतर्क करुन आरोपींचा शोध घेण्याच्या सुचना दिल्या. पोलीसांनी आरोपींचे वर्णनावरुन परिसरात त्वरीत शोधमोहीम सुरु केली. **शोधादरम्यान पोलीस ठाणे मानकापूर येथील बिट मार्शल पोलीस अंमलदार सिध्दार्थ मंडपे व होमगार्ड जॅकी साळुंके यांनी सर्वप्रथम** आरोपी १) यश उर्फ गणपत कमलाकर गांवडे वय २२ वर्ष रा. माधवनगर, हनुमान मंदीरजवळ, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर यास ताब्यात घेतले. **तसेच पोलीस ठाणे मानकापूर येथील तपास पथकातील पोहवा राजेश भरणे, राहुल गवई व पोअं. विपीन रक्षे, प्रशांत खंडारे यांनी शोध घेऊन** आरोपी २) नविन सुगन उईके वय २८ वर्ष रा. प्लॉट क्र. ५२८, निर्मलनगर, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर यास ताब्यात घेतले. दोन्ही आरोपीची सखोल विचारपुस केली व गुन्हयातील त्यांचे इतर साथीदारांची नावे निष्पन्न झाल्याने तपास पथके व गुन्हेशाखा येथील पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी ३) समिर उर्फ पाजी संतोष उईके वय १९ वर्ष रा. रेणुका अपार्टमेंट समोर, गोरेवाडा

बसस्टॉपजवळ, गिट्टीखदान, नागपूर ४) सुलभ उर्फ राज राजेंद्र धमेंद्र ठाकूर वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. १२१, विशाखा सोसायटी, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर ५) संजय उर्फ निलेश दिनेश जोगी वय ३० वर्ष रा. निर्मल नगर, मौर्य चे घरी किरायाने, मानकापूर, नागपूर ६) रोहीत विनोद जगदाळे वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ७२, दर्शना सोसायटी, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर व एक १७ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले. आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

गुन्हयातील आरोपींचे शोधमोहीमेदरम्यान मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यांचे मार्गदर्शनात मा. अपर पोलीस आयुक्त मा. श्री. राजेंद्र दाभाडे, श्रीमती विनीता शाहू, पोलीस उपआयुक्त मा. श्री. दीपक अग्रवाल, श्री राहुल मदने, वपोनि हरीष काळसेकर, मानकापूर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार, गुन्हेशाखेतील विविध पथके व बिट मार्शल यांनी संयुक्तिकरित्या राबविली. पोलीसांनी घटनेची माहिती मिळताच, तात्काळ प्रतिसाद देऊन आरोपींची शोधमोहीम घेऊन आरोपींना लगेच ताब्यात घेतल्याने आरोपींकडून घडणाऱ्या संभावित इतर गुन्हयांना प्रतिबंध झाला.

मा. पोलीस आयुक्त यांनी पोलीसांनी त्वरीत आरोपींचा शोध घेऊन केलेल्या कामगिरीची दखल घेऊन अधिकारी व अंमलदार यांचे मनोधैर्य उंचावून, त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी व भविष्यातही अशीच तत्पर कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहनपर सपोनि भगवान कोळी यांना रुपये १०००/— रु., सर्वप्रथम आरोपींचा शोध घेणारे मानकापूर येथील बिट मार्शल यांना रुपये ५०००/— रु., मानकापूर येथील तपास पथकातील अंमलदार यांना ५०००/— रु व इतर आरोपींचा शोध घेऊन अटक करणारे गुन्हेशाखा येथील अधिकारी व अंमलदार यांना ५०००/— रु. चे बक्षिस जाहीर केले आहे.

## (गुन्हे)

**<u>पोलीस ठाणे कळमणा :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.</u>**

दिनांक १८.०७.२०२६ चे २२.१५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, चिखली वस्ती, गुप्ता किराणा मागे एक इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आर्यन रोशन अरखेल वय २२ वर्षे रा. गंगाबाई घाट, स्विपर कॉलनी, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत आरोपीचे एक लोखंडी धारदार चाकु मिळून आल्याने किंमती ५००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. १८/२०२६, दिनांक २९.०५.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०६ महिन्यांकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.